# ई - पोलीस पत्रिका

दि. २३/०९/२०२४ अनु.क्र.१७२

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/८३५७/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/०९/२०२४**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपनाकरीता विशेष रजा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम व ब.नं. व नांव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/११९,शिल्पा शिरभाते (पोलीस मुख्यालय) | दि.२८/०९/२००८ | २ | पहिल्या | ३० दिवस |
| २ | मपोहवा/९६७, शिवाली पुरी (पोलीस नियंत्रण कक्ष) | दि.२९/१०/२०१३ | २ | पहिल्या | ३० दिवस |
| ३ | मपोशि/४२७, रुक्सार शेख गफुर (पोलीस मुख्यालय) | दि.०९/०४/२०२४ | १ | दुस-या (प्रसुतीला जोडुन) | ६० दिवस |

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी उपरोक्त नमूद अ.क्र.३ वगळुन इतर महिला पोलीस अंमलदार यांना गणेशोत्सव तसेच ईद बंदोबस्ताचे अनुषंगाने दिनांक २४.०९.२०२४ नंतरच बालसंगोपन रजेवर रवाना करावे तसेच अ.क्र.३ वगळुन इतरमहिला पोलीस अंमलदार यांनी बालसंगोपन रजा कालावधी दरम्यान नवदुर्गोत्सव किंवा विधानसभा निवडणुक बंदोबस्त असल्यास बंदोबस्ताकरीता कर्तव्यावर हजर रहावे.

**अटी व शर्ती :-**

१. मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

**२.पोआअ/आस्था-५/प्रसती रजा/८३७७/२०२४ अमरावती शहर दिनांक १९/०९/२०२४**

**आदेश**

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अरजा-१४०९/प्र.क्रं.८/०९/सेवा-६, दिनांक २४/८/२००९ व दि.१५/१/२०१६ चे तरतुदीनुसार १८० दिवस प्रसुती रजा, रजा वेतनासह प्रसुतीच्या संभाव्य तारखेपासुन अथवा प्रसुतीकरीता रजेवर सुटल्याचे तारखेपासुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.नं./ नाव | नेमणुक | नियुक्ती दिनांक | प्रसुतीची वेळ | प्रसुतीची संभाव्य तारीख | अपत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/२३६, अपेक्षा शेषराव आग्रे(मोहोड) | पो.स्टे. गाडगेनगर | दि०१.०८.२०१६ | पहिली | १७.०१.२०२५ | -- |

वरिल नमुद महिला पोलीस अंमलदार यांना रजेवर सोडल्याचा व हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

**३.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा अमान्य /८५६२/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/०९/२०२४**

**आदेश**

मपोना/१४७१ माया अंबुलकर नेमणुक पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर यांनी धार्मिक कामाकरीता अर्जित रजा मंजुरी करीता विनंती अर्ज सादर केलेला आहे परंतु त्यांचे रजा खात्यात अर्जित रजा शिल्लक नसल्याने विनंती अमान्य करण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**०१.पोआअ/विचौ/निलंबन कालावधी/निर्वाह भत्ता/८५१९/२०२४अमरावती शहर दिनांक २४/०९/२०२४**

**आदेश**

खालील नमुद निलंबित अंमलदारयांना निलंबनामध्ये मुख्यालयी उपस्थित राहून दैनंदिनहजेरी लावण्याचे निर्बध निलंबन आदेशामध्ये घालण्यात आलेहोते. तरीसुध्दा निलंबीत अंमलदारहे दैनंदिनहजेरी न लावता व वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता परस्पर त्यांच्या नावासमोर दर्शविलेले दिवस गैरहजर राहील्यामुळेत्यांनी निलंबन आदेशात निर्धारीत केलेल्या शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांचा निलंबनाच्या काळात मुख्यालयीहजर असलेल्या दिवसाचा निर्वाह भत्ता म.ना.से. (निलंबन, बडतर्फी इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) (ए) तरतूदीनूसार मंजूरकरण्यांत येत आहे.

| अ. क्र | पो.अधि./अंमलदार यांचे नाव पदनाम/ ब.नं. | निलंबन दिनांक | कालावधी | निलंबित मुख्यालयीहजर/गैरहजर माहिती | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हजर दिवस | गैरहजर दिवस | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोशि/१६९१ विशाल गजभिये, नेमणूक पो.स्टे. नागपूरीगेट | ०२/०६/२०२३ | दि.१/०८/२०२४ ते दि.३१/०८/२०२४ | -- | ३१ | -- |
| २ | पोना/१०५९ सागर निचळे, नेमणूक पो.स्टे. राजापेठ | १७/५/२०२४ | दि.१/०८/२०२४ ते दि.३१/०८/२०२४ | ३१ | -- | -- |

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**०१.पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./पोहवा-५६ शेंडे/८४३९/२०२४अमरावती शहर दिनांक २०/०९/२०२४**

## आदेश

**पोहवा/५६, सुहास रामचंद्र शेंडे, नेमणूक पो.स्टे.फ्रेजरपुरा** यांचे वेतनात तफावत असल्याने त्यांना सन-२०२४ ची नियमीत वेतनवाढ अदाकरण्यात आली नाही. त्यांचे वेतन तपासण्यात आले असुनत्यांचीशासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम २०१९ मधीलतरतुदीप्रमाणेखालीलप्रमाणेसुधारीत वेतन निश्चितीकरण्यातआली असुन त्यांना सन-२०२४ ची नियमीत वेतनवाढ मंजूरकरण्यातयेत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |

| विद्यामान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | वेतन बँड/ वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | वेतन बँड/ वेतन | |
| ०१/०७/२०२३ | रु.४११००/- | एस-९ | ०१/०७/२०२३ | रु.४११००/- | एस-९ |
| ०१/०७/२०२४ | -- | | ०१/०७/२०२४ | रु.४२३००/- | एस-९ |

प्रस्तुत प्रकरणीकरण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे अनुज्ञेय असणारी थकबाकी वेतनात रोखीन अदाकरण्यात यावी. तसेच सदरची वेतन निश्चितीही वेतन पडताळणी पथक यांचे अतिम तपासणीचे अधीन राहून करण्यात आली असून भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिप्रदानाची रक्कम त्यांचे कडून वसूल करण्यात येईल.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस